**"मे २०२१" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ६ मे २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ करिता वनामनती नागपूर या प्रशिक्षण संस्थेस ३६-सहायक अनुदान (वेतने) या लेखाशीर्षाखाली मार्च व एप्रिल २०२१ या कालावधीच्या वेतनाकरिता रु.९,८६,७७४/- इतकी रक्कम वितरित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
- दिनांक १० मे २०२१ च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२१-२२ या चालू आर्थिक वर्षातील बदल्या दिनांक ३० जून २०२१ पर्यंत करण्यात येऊ नयेत अशा सूचना निर्गमित केल्या आहेत.
- दिनांक ११ मे २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ करिता यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेस ३६-सहायक अनुदान (वेतने) या लेखाशीर्षाखाली रु.६,१३,२०८/- इतकी रक्कम वितरित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
- दिनांक १४ मे २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये कोविड विषाणूच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात विविध विभागात होणाऱ्या बैठका तसेच वैयक्तिक स्वरुपाच्या कार्यक्रमासाठी बाहेरुन खाद्यपदार्थ मागविण्यात येऊ नयेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक १९ मे २०२१ च्या शासन निर्णयान्वये यशदा, पुणे या संस्थेच्या नियामक मंडळावर श्री.नितीन करीर, भाप्रसे, अपर मुख्य सचिव (महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- दिनांक १९ मे २०२१ च्या शासन पूरक पत्रान्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवडमंडळाच्या कार्यकक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) व गट-क ची पदे सरळसेवेने भरताना पॅनेलवरील कंपनीमार्फत स्पर्धा परीक्षा प्रकिया राबविण्यासाठी संबंधित कंपन्यांच्या संपर्काचा तपशील दिला आहे.
- दिनांक २० मे २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अखत्यारीतील सहायक कामगार आयुक्त, गट-अ आणि सरकारी कामगार अधिकारी, गट-ब या दोन नवीन संवर्गांचा समावेश करण्यात आला आहे.
- दिनांक २० मे २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी यांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी केवळ अनुत्तीर्ण असलेल्या उमेदवारांकडून २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी अर्ज दिनांक २७ मे २०२१ पर्यंत मागविण्यात आले आहेत.
- दिनांक ३१ मे २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ या संवर्गातील २ अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक ३१ मे २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उपजिल्हाधिकारी, गट-अ या संवर्गातील ९ अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.

## (ख) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक

- एका निम्नश्रेणी लघुलेखकास उच्चश्रेणी लघुलेखक पदावर व एका लघुटंकलेखकास निम्नश्रेणी लघुलेखक पदावर प्रपत्र बढती देण्यात आली आहे.
- ६८ कक्ष अधिकाऱ्यांना अवर सचिव पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

### (ग) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन

- एका उपसचिवाची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.
- कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा २ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

### (घ) ज्येष्ठतासूची

- दिनांक १४ मे २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील मुख्य आचारी या गट-ड संवर्गातील २ कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २० मे २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये उपसचिव संवर्गाची सन २००५ ते २०१७ या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीची सुधारित तात्पुरती ज्येष्ठतासूची हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २० मे २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाची सन १९८६ ते २०१६ या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीची सुधारित तात्पुरती ज्येष्ठतासूची हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २० मे २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये अवर सचिव संवर्गाची सन १९९८ ते २०१७ या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीची सुधारित तात्पुरती ज्येष्ठतासूची हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****